## <u>राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक</u>

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

---

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**क्र. रामाआ-नाशिक/तक्रार क्र. २११/२०२४/अहिल्यानगर**

| तक्रारदार | प्रतिवादी |
|---|---|
| श्री. आण्णासाहेब मोहिनीराज जाधव,<br>रा. देशपांडे लेन, नेवासा खु.,<br>ता. नेवासा, जि. अहिल्यानगर. | निवासी नायब तहसिलदार,<br>तहसिल कार्यालय, नेवासा,<br>ता. नेवासा, जि. अहिल्यानगर. |

**<u>सुनावणी दिनांक १७/०७/२०२५</u>**

राज्य माहिती आयोग खंडपीठ नाशिक

१) तक्रारदार यांनी दिनांक १२/०४/२०२४ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. त्यामध्ये दिनांक १६/०७/२०२५ रोजी आयोजित सुनावणीसाठी तक्रारदार व विद्यमान जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

२) तक्रारदार यांनी दिनांक १२/०४/२०२४ रोजीच्या तक्रार अर्जात असे नमुद केले आहे की, "द्वितीय अपिल क्रमांक १६५१/२०१९/अहिल्यानगर संदर्भात आयोगाने पारीत केलेल्या आदेशाच्या अनुषंगाने संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपुर्ण, चुकीची व दिशाभुल करणारी माहिती दिली असून, संबंधितांवर शास्ती लावून, सुधारीत माहिती देण्यात यावी."

३) तक्रारदार यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या द्वितीय अपील क्रमांक. १६५१/२०१९/अहिल्यानगर, संदर्भात आयोगाने दि. २७/०६/२०२३ रोजी सुनावणीअंती पुढीलप्रमाणे आदेश पारीत केलेले आहेत.

"विद्यमान जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, नेवासा यांनी अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" मध्ये मागणी केलेल्या माहितीच्या अनुषंगाने आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसांच्या आत मागणी केलेली वस्तुनिष्ठ माहिती नोंदणीकृत पोचदेय डाकेने विनामुल्य पुरवावी व जी माहिती उपलब्ध होऊ शकत नाही. त्याबाबतचे स्पष्ट कारण नमुद करुन अपिलार्थीस लेखी कळवावे."

५) सुनावणीदरम्यानचा युक्तीवाद व प्रस्तुत नस्तीवरील कागदपत्रे विचारात घेता असे दिसून आले की, सदर प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दिनांक ०७/०३/२०२४ च्या पत्रान्वये माहिती पुरवली असल्याचे दिसून येते. मात्र अपिलार्थी यांनी आयोगास सुनावणीदरम्यान असे स्पष्ट केले की, "जन माहिती अधिकारी यांनी जुनेच पुर्वीचेच खोटे बनावट असे ७/१२ उतारे देवुन सदर आवश्यक उताऱ्यासाठी जमीन महसूल अधिनियम १९६६ च्या कलम १५५ नुसार अपील तहसिलदार यांच्याकडे करुन दुरुस्तीसाठी आदेशीत करुन घ्यावे असे नमुद करुन माहिती दिलेली आहे. ती अत्यंत चुकीची बनावट व दिशाभुल करणारी आहे. अधिकाराचा गैर वापर करणारी आहे. वास्तवीक १५५ ची दुरुस्ती यापुर्वीच झालेली असून सदर ७/१२ दुरुस्तीची चुकही महसुल खात्याच्या अंतर्गत बाब असून तिचा रिव्ह्यु कलम २५७ नुसार घेणे आवश्यक असतांना दिशाभुल करणारी माहिती जुन्या ७/१२ उताऱ्यासह दिलेली आहे." तक्रारदार यांनी संबंधितांना बोलावून शास्ती लावून फेर आदेश सदर ७/१२ उतारे देण्यासाठी करण्यात यावा, अशी विनंती तक्रार अर्जात केली आहे. माहिती अधिकार अधिनियम द्वारे जी माहिती जशी आहे तशी देणे अभिप्रेत आहे. महसूली कागदपत्रात काही बदल अपेक्षित असेल तर त्यासाठी संबंधित प्राधिकरणाकडे

दाद मागणे आवश्यक आहे. राज्य माहिती आयोगाच्या, खंडपीठ नाशिक यांच्या आदेशाची अंमलबजावणी करतांना चुकीची, बनावट व दिशाभूल करणारी माहिती दिली अशी तक्रार केली असल्याने ज्या जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली, त्यांचा खुलासा मागणे योग्य राहील. तसेच, विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी माहिती देणे योग्य राहिल. सबब प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१) विद्यमान जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, नेवासा यांनी आयोगाने द्वितीय अपिल क्रमांक. १६५१/२०१९/अहिल्यानगर मध्ये दिनांक २७/०६/२०२३ रोजी सुनावणीअंती दि. ०१/०२/२०२४ रोजी पारीत केलेल्या आदेशाची अंमलबजावणी करावी.

२) आयोगाने द्वितीय अपिल क्रमांक १६५१/२०१९/अहिल्यानगर संदर्भात दि. २७/०६/२०२३ रोजी सुनावणीअंती दि. ०१/०२/२०२४ रोजी पारीत केलेल्या आदेशाचे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, नेवासा यांनी पालन केले नाही. म्हणुन त्यांचे विरुध्द माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम २०(१) नुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये याचा लेखी खुलासा त्यांनी १५ दिवसात आयोगास सादर करावा. त्यांचा लेखी खुलासा विहित मुदतीत आयोगास प्राप्त न झाल्यास त्यांचे या प्रकरणी काहीही म्हणणे नाही असे गृहित धरुन शास्तीची कार्यवाही कायम करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

३) वरील निर्देशांसह प्रस्तुत तक्रार क्रमांक २११/२०२४/अहिल्यानगर निकाली काढण्यात येत आहे.

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक.

राज्य माहिती आयोग

**जावक क्र** 8028 **दिनांक** 18 NOV 2025